नि.दि.दावा क्र. २४/२००६
निशाणी क्र. १२२ पुढे सुरु...

प्रतिवादी क्र. १५ तर्फे साक्षीदार क्र. १ यांचा शपथेवर उलटतपास वादींतर्फे अधिवक्ता श्री. एस. एम. बेळगांवकर यांचेकडून....

६. हे खरे नाही की, मी कायमस्वरुपी बेळगाव येथे वास्तव्यास आहे. हे खरे की, माझ्या अधिवासाबाबतची कागदपत्रे बेळगाव येथील आहेत. मी चंदगड येथे वास्तव्यास नाही. यातील वादी व त्याचा भाऊ इस्माईल यांना मी ओळखतो. साक्षीदार पुन्हा सांगतो की, मी इस्माईल यास ओळखत नाही. वाद मिळकत गट क्र. ७३८ याचे एकूण क्षेत्र किती आहे हे मी आता सांगू शकत नाही. हे खरे की, मी दि. २३/०४/१९९३ रोजी यातील वादीचा भाऊ इस्माईल महंमद शहा यास २५ गुंठे इतकी जमिन खरेदी दिली आहे. हे खरे की, त्याचदिवशी मी आदम महंमद शहा यास गट क्र. ७३८ पैकी ५० आर. क्षेत्राची जमिन विक्री केली आहे. माझा भाऊ धुंडाप्पा शिवलिंगाप्पा हुंबरवाडी याने गट क्र. ७३८ चा जुना सर्व्हे क्र. ४३५ पैकी हे. १-६० आर इतकी जमिन वादी व वादीचा भाऊ इस्माईल यांना दि. ०१/०६/१९८२ रोजी विकली असेल.

७. वाद मिळकतीच्या ८० आर. क्षेत्राची चतुःसिमा मला सांगता येणार नाही. ***साक्षीदाराचा पुरावा सुरु असताना प्रतिवादी अब्दूल गफार मोहंमद मकानदार न्यायालयात उपस्थित असून ते साक्षीदारास हातवा-याने इशारा करीत असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आले. त्यांना तसे न करण्याबाबत ताकीद देण्यात येते.*** प्रतिवादी क्र. १ चे मयत पती महमूद फकीर हे वाद मिळकतीमधील २ एकर क्षेत्रात कूळ म्हणून वहिवाट करीत होते. माझ्या पुराव्याच्या शपथपत्रातील माझे विधान की, 'गट क्र. ७३८ पैकी ३ एकर ३५ गुंठे इतकी जमिन महंमद युनूस फकीर याच्याकडे कूळ म्हणून वहिवाटीस होती.' हे चुकीचे आहे. हे खरे नाही की, नोव्हेंबर १९८३ मध्ये मी दावा जमिन विक्रीस काढली होती व वादी मला भेटून त्याने माझ्याकडे दावा जमिन खरेदी करण्याची तयारी दर्शविली होती. हे खरे नाही की, त्यावेळी मी त्यास माझ्या शेतजमिनीतील कूळ महंमद युनूस फकीर याच्याकडून वाद जमिनीचा कब्जा घेण्यास सांगितले होते. हे मला माहित नाही की, वादी आदम महंमद शहा

हा महंमद युनूस फकीर याचा नातलग असल्याने त्याने वाद मिळकतीचा ताबा त्याच्याकडून दि. ०१/१२/१९८३ रोजी लिखीत दस्ताद्वारे घेतली होती किंवा कसे. हे खरे नाही की, आदम महंमद शहा याने त्यानंतर मला भेटून वाद मिळकतीचे खरेदीखत करुन देण्याविषयी विनंती केली होती मात्र मी त्यास खरेदी करुन देण्यास नकार दिला होता. हे खरे की, दि. ०१/१२/१९८३ पासून वाद मिळकत ही मयत वादी आदम महंमद शहा व त्याच्यानंतर त्याचे वारस यांच्या ताब्यात आहे. हे खरे नाही की, वादी हे वाद मिळकतीमध्ये नाचणा, अशी पिके घेत आहेत. हे खरे नाही की, वाद मिळकतीमधील उगवणारे गवत वादी हे घेत असतात.

८. सन १९५७ पासून वाद मिळकत महंमद युनूस फकीर यांच्या कब्जेवहिवाटीत असतानाही त्या जमिनीचे कूळ कायदयान्वये खरेदीखत त्याच्या नावे का झाले नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. मी त्यावेळी अज्ञान होतो. माझे वय ७१ वर्षे आहे. मी सज्ञान झाल्यानंतर महंमद फकीर याने मला कूळ कायदा कलम ३२ फ नुसार खरेदी घेण्याची नोटीस पाठविली नव्हती. आजपर्यंत मला अशी नोटीस प्राप्त झाली नाही. हे खरे नाही की, वाद मिळकतीवर महंमद युनूस फकीर व त्याच्या वरसांचा मुळातच कब्जा नसल्याने त्यांनी मला तशी नोटीस आजपर्यंत दिली नाही. हे खरे नाही की, प्रतिवादींना मदत करण्यासाठी मी खोटया मजकूराचे शपथपत्र दाखल केले असून आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण**.....

श्रवणोत्तर स्विकृत

समक्ष,

Amrit Chandrakant Birajdar

Digitally signed by Amrit Chandrakant Birajdar
Date: 2019.08.31 13:45:02 +0530

(अमृत चं. बिराजदार)

दिवाणी न्यायाधिश क. स्तर, चंदगड.

दिनांक: २२.०८.२०१९

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this P. D. F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Shri. V.G. Kamble, L. G. Stenographer. |
| Name of Court | Shri. A. C. Birajdar,<br>Civil Judge, Junior Division and Judicial Magistrate, First Class, Chandgad. |
| Date of Dictation | 22/08/2019 |
| order signed by the P. O. on | 22/08/2019 |
| order uploaded on | 23/08/2019 |